# ७. नाणी व नोटा


## नाणी व नोटा यांची मोड (सुटे)

◆ १ रुपयाची मोड म्हणजे



५० पैशांची २ नाणी

◆ २ रुपयांची मोड म्हणजे



५० पैशांची ४ नाणी


किंवा

१ रुपयाची २ नाणी

किंवा

१ रुपयाचे १ नाणे व
५० पैशांची २ नाणी

◆ ५ रुपयांचे सुटे म्हणजे



१ रुपयाची ☐ नाणी

किंवा

२ रुपयांची ☐ नाणी
व १ रुपयाचे ☐ नाणे

किंवा

५० पैशांची ☐ नाणी

◆ १० रुपयांचे सुटे म्हणजे



५० पैशांची ☐ नाणी

१ रुपयाची ☐ नाणी

२ रुपयांची ☐ नाणी

२ रुपयांची ☐ नाणी व १ रुपयाची ☐ नाणी

५ रुपयांची ☐ नाणी




आई : नंदू, जा बरं दुकानातून ५०० रुपये सुटे करून आण.






नंदूने आणलेले सुटे पैसे

◆ 

₹ २० + ₹ २० + ₹ १०

₹ १० + ₹ १० + ₹ १० + ₹ १० + ₹ १०

५० रुपयांचे सुटे म्हणजे २० रुपयांच्या २ नोटा व १० रुपयांची १ नोट किंवा १० रुपयांच्या ५ नोटा. यापेक्षा वेगळ्या पद्धतीने देखील मोड कशी करता येईल, ते सांगा.

◆ 

२० रुपयांचे सुटे म्हणजे ५ रुपयांची ४ नाणी किंवा १० रुपयांची २ नाणी किंवा १० रुपयांचे १ नाणे व ५ रुपयांची २ नाणी. यापेक्षा वेगळ्या पद्धतीने मोड कशी करता येईल ते सांगा.

◆ २००० रुपयांचे सुटे म्हणजे



→ २० रुपयांच्या ☐ नोटा


→ ५० रुपयांच्या ☐ नोटा


→ १०० रुपयांच्या ☐ नोटा

→ ५०० रुपयांच्या ☐ नोटा

## बंदे करणे

एखाद्या रकमेच्या लहान मूल्याच्या नोटा किंवा नाणी देऊन तेवढ्याच रकमेची जास्त मूल्याची नोट किंवा नाणे घेणे म्हणजे बंदे करणे.




## स्वाध्याय

१. रिकाम्या चौकटींत योग्य संख्या लिहा.

(१) ५ रुपयांच्या ☐ नोटा →
१० रुपयांच्या ☐ नोटा →
२ रुपयांची ☐ नाणी व १० रुपयांची ☐ नाणी →
बंदे ५० रुपये

(२) ५ रुपयांच्या ☐ नोटा →
१० रुपयांच्या ☐ नोटा व २० रुपयांच्या ☐ नोटा →
२० रुपयांच्या ☐ नोटा →
५० रुपयांच्या ☐ नोटा →
बंदे १०० रुपये

(३) १० रुपयांच्या ☐ नोटा

२० रुपयांच्या ☐ नोटा

५० रुपयांच्या ☐ नोटा

१०० रुपयांच्या ☐ नोटा

५०० रुपयांच्या ☐ नोटा

बंदे
२००० रुपये

२. अजयकडे ९ नोटा आहेत. त्या सर्वांची एकूण किंमत ५०० रुपये आहे, तर त्याच्याकडे कोणत्या किमतीच्या किती नोटा आहेत ?

३. स्वातीकडे काही १०० रुपयांच्या, काही ५० रुपयांच्या व काही २० रुपयांच्या नोटा आहेत. सर्व नोटांची एकूण किंमत ५०० रुपये आहे, तर तिच्याकडे प्रत्येक प्रकारच्या किती नोटा आहेत ?

४. नंदूकडे ६ नोटा आहेत. त्या सर्वांची एकूण किंमत १००० रुपये आहे, तर नंदूकडे कोणत्या किमतीच्या किती नोटा आहेत ?

५. सलमाकडे ११ नोटा आहेत. त्या सर्वांची एकूण किंमत १००० रुपये आहे, तर तिच्याकडे कोणत्या किमतीच्या किती नोटा आहेत ?

---

◆ 

१० रुपयांच्या १० नोटा

५० रुपयांच्या २ नोटा

१०० रुपयांच्या नोटेचे मूल्य १० रुपयांच्या नोटेच्या मूल्याच्या १० पट असते किंवा १०० रुपयांच्या नोटेचे मूल्य ५० रुपयांच्या नोटेच्या मूल्याच्या दुप्पट असते.

---

◆ 

₹ १०० + ₹ १०० + ₹ १०० + ₹ १०० + ₹ १००

५० रुपयांच्या १० नोटा

५०० रुपयांच्या नोटेचे मूल्य १०० रुपयांच्या नोटेच्या मूल्याच्या पाचपट असते किंवा ५०० रुपयांच्या नोटेचे मूल्य ५० रुपयांच्या नोटेच्या मूल्याच्या दहापट असते.

---

◆ 

५०० रुपयांच्या ४ नोटा

१०० रुपयांच्या २० नोटा

२००० रुपयांच्या नोटेचे मूल्य ५०० रुपयांच्या नोटेच्या मूल्याच्या ☐ पट असते.

२००० रुपयांच्या नोटेचे मूल्य १०० रुपयांच्या नोटेच्या मूल्याच्या ☐ पट असते.